नियं.दि.दावा क.105 / 2025
किशोर वि. सावन

**आदेश नि. क.16 वर**

दिनांक २५/०६/२०२६

प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज हा उभयपक्षाने ''जैसे थे परिस्थिती'' ठेवण्याबाबत आदेश पारीत करणेसाठी दाखल केला आहे.

2. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एन. व्ही. दारव्हेकर यांनी असा युक्तीवाद केला कि, सदर प्रकरण वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द दि. 20/12/2025 रोजी वादीच्या शांततापुर्वक दाव्यातील जागेच्या ताब्यास, वापरास, बांधकामास व उपभोगास प्रतिवादीने कधीही व कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करु नये असा प्रतिवादी विरुध्द कायम मनाई हुकुमनाम्यासाठी दावा दाखल केला आहे. सदरील प्रकरणात प्रतिवादीने दि. 18/04/2026 रोजी त्यांचा लेखी जवाब दाखल केला आहे. वास्तविक वाद मिळकत ही प्रतिवादीचे मामा यांच्या मालकीची होती. वादीने ग्रामसेवकाशी संगणमत करुन नमुना 8–अ त्यांच्या नावाने करुन घेतला आहे. तसेच सदर वाद मिळकतीमध्ये वादी यांनी खड्डे खोदुन बांधकाम करण्यास सुरुवात केलेली आहे. सदर वाद मिळकतीत बांधकाम झाल्यास अर्जदाराचा हक्क संपुष्टात येवून अर्जदाराचे कधीही न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आहे ती परिस्थिती ठेवण्यात यावी अशी विनंती केली.

3. हे कायदेचे प्रस्तापित तत्व आहे की, दाव्याची सध्याची परिस्थिती नेमकी काय आहे व ती दोन्ही बाजुस मान्य असल्याशिवाय ''जैसे थे परिस्थिती'' बाबत आदेश पारीत करु नये.

4. प्रस्तुत दाव्यात सध्याची परिस्थिती नेमकी काय आहे, ही बाब अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही. वाद मिळकत ही प्रतिवादी यांचे मामाच्या नावे असुन वाद मिळकतीमध्ये वादी बांधकाम करत असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे. परंतु वाद मिळकत प्रतिवादी यांच्या मामाच्या नावे असल्याबद्दल तसेच वादी हे वाद मिळकतीमध्ये बांधकाम करत असल्याबद्दल प्रतिवादी यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वादमिळकतीची सध्याची परिस्थिती नेमकी काय आहे, हे माहित नसताना व वादीच्या गैरहजेरीत ''जैसे थे परिस्थिती'' ठेवण्या बाबतचा आदेश पारीत करणे योग्य व न्यायोचित नाही. करिता अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.06.25 16:45:21 +0530

ठिकाणः दिग्रस
दिनांक २५/०६/२०२६

**( बा. ना. गोडबोले )**
दिवाणी न्या.क.स्तर, दिग्रस